# Workshop on Mental Health

**अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,**
**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती (स्वायत्त)**
**समाजशास्त्र विभाग**

दि. ११/०२/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

विषय: एक दिवसीय "मानसिक आरोग्य" कार्यशाळेचा अहवाल....

महोदय,

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये आपल्या महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग व राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय "मानसिक आरोग्य" कार्यशाळा शुक्रवार दिनांक १०/०२/२०२३ रोजी आयोजित केली होती. या कार्यशाळेसाठी व्याख्याते म्हणून मा. दीपा पवार, कार्यकारी संचालक, अनुभूती सामाजिक संस्था, मुंबई यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे मानसशास्त्र विभागाचे विभागप्रमुख, डॉ. विजय शिंदे सर हे उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये मुले-मुली अशी विद्यार्थ्यांची प्रश्नावली स्वरुपात स्पर्धा घेण्यात आली. तसेच मानवी चेहऱ्याची चित्र व त्या पाठीमागील विविध भावना आणि त्या विषयकचे दृष्टीकोन याबाबत विश्लेषण करून विद्यार्थ्यांना समजून सांगितले. विद्यार्थ्यांना विविध पोस्टर दाखवून त्याविषयी मते विचारून घेऊन त्या विषयी चर्चा केली. विद्यार्थांना मानसिक आरोग्य या विषयावर लघुपट दाखवण्यात आला व त्याविषयी विद्यार्थ्यांची मते जाणून घेऊन वक्त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच आपण मानसिक आरोग्य कसे टिकवून ठेऊ शकतो व उत्तम निरोगी जीवन कसे जगू शकतो याविषयी संवाद साधला. मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांशी विविध प्रश्नावर चर्चा झाली. या कार्यशाळेत पदवी प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष तसेच पदव्युत्तर विभागातील ६१ विद्यार्थी सहभागी झाले.

कार्यशाळा समन्वयक
प्रा. नितीन चव्हाण

समाजशास्त्र विभागप्रमुख
प्रा. विनायक लष्कर


Latitude: 18.160564
Longitude: 74.58002
Elevation: 597.23m
Accuracy: 7.5m
Time: 10-02-2023 13:10:04
Note: मानसिक आरोग्य कार्यशाळा
समाजशास्त्र विभाग
शैक्षणिक वर्ष 2022 -23
दिनांक 10/02/2023


Latitude: 18.160555
Longitude: 74.579947
Elevation: 557.73m
Accuracy: 60.0m
Time: 10-02-2023 10:25:46
Note: मानसिक आरोग्य कार्यशाळा
समाजशास्त्र विभाग
शैक्षणिक वर्ष 2022 -23
दिनांक 10/02/2023